**Maratha Vidya Prasarak Samaj's**

**G. M. D. Arts, B. W. Commerce and Science College, Sinnar**

**One day state level seminar on "Tribal Movements in Maharashtra"**

Under the Savitribai Phule Pune University Quality Improvement Scheme and in the College Political Science, History, Economics, Defense Science, IQAC A one-day state level seminar under the interdisciplinary title "Tribal Movements in Maharashtra" on behalf of the departments on Saturday. Successfully completed on 24/02/2018. The purpose of this seminar is the secretary of MVP Samaj Sanstha Dr. Done by Sunil Dhikle. The program was chaired by the Director of the Institute Hon. Mr. Hemantana was getting angry. On the occasion of the program, senior tribal writer Dr. Vinayak Tumram as the chief speaker while Dr.P.D.Devare, Dr. Prashant Amritkar, Mr. Mukund Dikhit Dr. P. A. Ghosh, Principal Dr. JD Sonkhaskar Dr. V. D. Kadi, Prof. Vice Principal R. V. Pawar, Coordinator Prof. A. A. Pote, Convenor, Prof. S. K. Aware, Dr. SN Pagar, Prof. R. D. Agawan, Dr. Amol Kategaonkar was present.

Introductory speech was given by Principal Dr. J. D. Sonkhaskar, explaining the role and purpose of the seminar, She said that the problems of the tribals are not limited to them but they will not be solved until they feel that they are ours. Government should pay more attention to education, health, communication, all their human rights of tribals. Tribal women are given reservation in politics but it is not properly and realistically implemented. Therefore, it is necessary to take appropriate measures. The program was inaugurated by Dr. In his speech, Sunil Dhikle said that it is necessary to change the attitude towards tribal society. For that, it is necessary to provide infrastructure and daily needs to them. Only then the tribal society can live with dignity. It is necessary to provide employment to the tribal community. The program was chaired by the Director of the Institute Hon. Mr. Hemantnana Vaje, through his presidential speech, praised Chhatrapati Shivaji Maharaj's struggle against Aurangzeb and the contribution of the tribal community in India's freedom movement.

Dr. Vinayak Tumram presented his thoughts on the historical, social and cultural background of tribal on the ethical, social and cultural background of the movements of the tribal community in the speech. Having said that, if the problems of tribal society are to be solved, it is the need of

the hour to understand the concept of tribalism in modern times. The work of tribals has been remarkable in the history of the world. It is necessary to understand the history, social, economic, political and geographical issues of the tribals so that they should be brought along with the eternal social flow and the plans and policies designed for them should be implemented. Only if this works out will the seminar be held. The various dialects, languages, traditions and customs of the tribal society have survived even today. Ideological and cultural development should take place there because through such cultural movement the problems of human life and their solutions are planned. As a result of the educational movement, their way of thinking and standard of living improved. But since the tribal society lives in such remote hilly regions, the tribal society seems to be facing a conscious struggle recently with many problems.

Dr. P.D. Deore as the chairman of the second session and Dr. Prashant Amritkar as resource person explained his role regarding the political and social development of the tribal community in Maharashtra. The effort to provide all the supplementary facilities to the tribals so that they can live like other citizens and enjoy their human rights has been going on since the post-independence period. But corruption, illiteracy, lack of leadership, drug addiction, malnutrition, political apathy, lack of effective organizations etc. Therefore, the tribal community is unaware of its rights, "rights". As a result, the political jockeying for power and fundamental rights issues become questions. Prof. Padurang Bhoye as the subject expert as the chairman, the role of tribals in Maharashtra in politics, leadership and political development is recognized as one of the importance of tribals in India. Political climate Adiwamodara Galav is the pillar of the Indian statehood through the Adivasi Banana and Gramayan Panayanammiti Zilla Parishad Vidhan Sabha, Lok Sabha. It is far from the modern society. For political survival, the motto of giving reservation for government benefits has to be re-done. Morya Mahatayakar presented his position on the subject of Maharashtra and human rights. In this, the Indian state group has made special provisions for the federal development of tribals as well as for their protection and raising their standard of living, that is, the provision of educational and economic development in the guidelines of Articles 14-18, Article 23 of the Guidelines, Article 46, Article 330, 332, Legislatures and Local Self-Government to give representation in proportion to the population. Dawa Article 335 National Commission Article 338 A such provisions are the Constitution of Tribal Society.

Dr. Kath, the seven presidents. D. Sonkhaskar and Mr. Mukut Dixit as a subject expert presented his position on the group and human rights of tribals in Maharashtra. The Indian state group made special provisions for the overall development of tribals as well as to protect them and improve their material life. And according to Section 330 and 332 of the Economic Development Act 46, the right of representation is given in proportion to the population in the Parliament legislatures and local self-government bodies. Claims for representation in public employment Article 335 National Commission Article 338 A There are provisions such as the broad and substantial provisions made in the constitution to benefit the tribal community, the central and state governments have made tribal development laws implementing the guidelines of the state policy. The laws passed by both the governments in the context of eradication of encroachment, prevention of atrocities, land rights, forest rights, clan occupation etc. have definitely been useful for the social and economic upliftment of tribals. Due to Maharashtra Tribal Reforms, the exploitation and economic exploitation of tribals from generation to generation has been reduced to some extent. It appears so. In the concluding session, Dr. V. D. Kadi, Dr. Mrs. K. M Ahire, Prof. Pradeep Deshpande, Prof. Gyanoba Dage. Prof. Gorat commented on the successful topics of the seminar. In this seminar, 56 professors and 72 students participated in a total of 128 delegates.

HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

डॉ.श्रीमती जे.डी.सोनखासकर
प्राचार्य

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर जि. नाशिक. आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजना यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, संरक्षणशास्त्र व आय.क्यु.ए.सी. विभागातंर्गत आंतरविद्याशाखीय एकदिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्र

# "महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी चर्चासत्र अहवाल"

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत व महाविद्यालयातील **राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र, आय.क्यू.ए.सी. विभागांच्या** वतीने **"महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी"** या आंतरविद्याशाखीय शिर्षकाखाली एकदिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे **शनिवार दि. २४/०२/२०१८** रोजी यशस्वीपणे संपन्न झाले. या चर्चासत्राचे उद्घाटन मविप्र समाज संस्थेचे चिटणीस डॉ.सुनिल ढिकले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक मा. श्री.हेमंतनाना वाजे होते. सदर कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावर जेष्ठ आदिवासी साहित्यिक डॉ.विनायक तुमराम प्रमुख बीजभाषक म्हणून तर डॉ.पी.डी.देवरे, डॉ.प्रशांत अमृतकर, श्री. मुकुंद दिक्षीत डॉ. पी.ए.घोष, प्राचार्य डॉ.जे.डी.सोनखासकर डॉ.व्ही.डी.कापडी, प्रा. उपप्राचार्य आर.व्ही.पवार, समन्वयक प्रा. ए.ए.पोटे, संयोजक, प्रा.एस.के.आवारे, डॉ. एस.एन पगार, प्रा.आर.डी.आगवाने, डॉ.अमोल काटेगावकर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.जे.डी.सोनखासकर यांनी केले या प्रसंगी त्यांनी चर्चासत्राची भुमिका व उद्देश स्पष्ट करतांना म्हटले की, आदिवासींचे प्रश्न त्यांच्यापुरते मर्यादित नसून ते तुमचे आमचे आहेत असे जोपर्यंत वाटत नाही तोपर्यंत ते सुटणार नाहीत. शासनाने आदिवासींच्या शिक्षण, आरोग्य, दळणवळण, त्यांचे सर्व मानवी अधिकार याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. आदिवासी महिलांना राजकारणात आरक्षण दिलेले असुनसुध्दा त्याची योग्य आणि वास्तविक अमलबजावणी होत नाही. त्यामुळे योग्य ते उपाय करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक व मविप्र समाज संस्थेचे चिटणीस डॉ.सुनिल ढिकले यांनी आपल्या भाषणात अलिकडे आदिवासी समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलने गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना पायाभूत सुविधा व दैनंदिन गरजा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. तरच आदिवासी समाजआपल्या बरोबर सन्मानाने जगू शकेल. आदिवासी समाजाला रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संचालक मा. श्री.हेमंतनाना वाजे यांनी अध्यक्षीय मनोगतातून छत्रपति शिवाजी महाराजांना औरंगजेबाच्या विरूध्द लढतांना तसेच भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी समाजाचे योगदान मोलाचे आहे.

बीजभाषणात डॉ.विनायक तुमराम यांनी आदिवासी समाजाच्या चळवळींची ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी या विषयावर आपले विचार मांडले. असे म्हटले की आदिवासी समाजाचे प्रश्न सोडवायचे असतील तर आधुनिक काळात आदिवासी संकल्पना समजून घेणे काळाची गरज आहे. जगाच्या इतिहासात आदिवासींचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे. आदिवासीचा इतिहास, सामाजिक, अर्थिक, राजकीय व भौगोलिक प्रश्न समजून घेउनच त्यांना सद्यकालीन समाजप्रवाहाबरोबर आणले पाहिजे यासाठी त्यांच्या विषयी आखलेल्या योजना ध्येय धोरणे प्रत्यक्ष अमलात आणणे गरजेचे आहे. हे निष्पन्न झाले तरच चर्चासत्र यशस्वी होइल. आदिवासी समाजाच्या विविध बोली, भाषा, परंपरा, चालीरीती आजही टिकून आहेत. त्याठिकाणी वैचारिक व सांस्कृतिक देवाण घेवाण झाली पाहिजे कारण अशा सांस्कृतिक चळवळीतून मानवी जीवनाच्या समस्या व त्यावर उपाय योजना आखल्या जातात. शैक्षणिक चळवळीचा परिणाम त्यांची विचार पद्धती व जीवनमानात सुधारणा झाली. परंतु आदिवासी समाज हा दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात राहत असल्याने अनेक समस्यासह आदिवासी समाज अलीकडे जाणीवयुक्त संघर्ष करताना दिसतो.

दुसऱ्या सत्राच्या अध्यक्ष म्हणून जेष्ठ अभ्यासक डॉ.पी.डी.देवरे तर विषय तज्ञ म्हणून डॉ.प्रशांत अमृतकर यांनी महाराष्ट्रातील आदिवासी समुहाचा राजकीय व सामाजिक विकासात्मक वाटचालीविषयी आपली भुमिका स्पष्ट केली आदिवासी समाज हा अज्ञान, अशिक्षित, अंधश्रध्दाळू, रुढी, परंपरा यामध्ये आजही गुरफटलेला आहे. आदिवासींना इतर नागरिकांप्रमाणे जीवन जगता यावे, त्यांना मानवी हक्कांचा उपभोग घेता यावा, यासाठी सर्व पूरक सुविधा पुरविण्याचा प्रयत्न आजही स्वातंत्र्योत्तर काळापासून सुरु आहे. मात्र भ्रष्टाचार , निरक्षरता, नेतृत्वहिनता, व्यसनाधिनता, वेठबिगारी, कुपोषण, राजकीय उदासिनता, प्रभावी संघटनांचा अभाव इ.त्यामुळे आदिवासी समाज आपले हक्क, अधिकार यांपासून अनभिज्ञ आहे. परिणामी सत्तेसाठीची राजकीय साठेमारी आणि मुलभूत हक्कांबाबतच्या समस्या, प्रश्न यांच्या जात्यात

भरडला जाऊन आदिवासी समाज हा मूळ नागरी विकास प्रवाहापासून दूर फेकला गेला आहे म्हणून संविधानात्मक उदिष्टपूर्तीसाठी आदिवासी समाजाला आपले अस्तित्व, आपले मुलभूत मानवी हक्क याची जाणिव होणे आवश्यक आहे.

तीसऱ्या सत्रात अध्यक्ष डॉ.पी.ए.घोष तर विषयतज्ञ म्हणून प्रा.पाडुरंग भोये महाराष्ट्रातील आदिवासींचे राजकारण, नेतृत्व आणि राजकीय विकास या विषयावर आपली भूमिका माडली. भारतात आदिवासींच्या ज्या महत्वाच्या चळवळी निर्माण झाल्या त्यापैकी राजकीय चळवळी ही स्वायत्तता म्हणून ओळखली जाते. स्वातंत्र व समानतेच्या तत्वावर निर्माण झालेल्या भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टानुसार आदिम जमातींना स्वायत्तता प्रदान करण्याची तरतूद आहे. आदिवासी बांधवांना राजकीय स्वायत्तता म्हणजे आदिवासींने राजकीय प्रशासन आदिवासींद्वारा चालवणे होय. म्हणून भारतीय राज्यघटनेच्या तरतूदीनुसार आदिवासी बांधवाना राजकारणात व स्थानिक प्रशासनात आरक्षणामुळे ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, लोकसभा आदिंद्वारे राजकीय स्थान मिळविले आहे. आदिवासी बांधवांना आपल्या हक्काची प्राचीन काळापासून जपलेली नैसर्गिक साधनसंपत्ती, आपल्या मालकीसाठी झगडावे लागले. सामाजिक व धार्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक जीवनात संघर्ष करुन अस्तित्व टिकविण्याची दिर्घकालीन लढाई व चळवळींना सामोरे जावे लागले. सध्या आदिवासी बांधवांना राजकीय स्वायत्ता टिकवून ठेवणे महान कठिण बनले आहे. त्यासाठी मोर्चा, आंदोलन, चळवळी करावी लागत आहेत. आदिवासी समाजाचे सांस्कृतिक, आध्यात्मिक संस्कृती वेगळी आहे तो प्रेमळ, प्रामाणिक हळवा, लाजरा समाज असून आधुनिक समाजापासून अद्याप कोस दूर आहे. राजकीय अस्तित्वासाठी शासकीय लाभासाठी आरक्षण टिकविण्याची मोठी कसरत, संघर्ष करावा लागत आहे.

चौथ्या सत्रात अध्यक्ष डॉ.जे.डी.सोनखासकर तर विषयतज्ञ म्हणून श्री.मुकुंद दिक्षीत यांनी महाराष्ट्रातील आदिवासींचे घटनात्मक आणि मानवी हक्क या विषयावर भूमिका माडली. यात भारतीय राज्यघटनेने आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांना संरक्षण देवून त्याचे भौतिक जीवनमान उंचावण्यासाठी विशेष तरतुदी केल्या त्या म्हणजे समतेचा अधिकार कलम १४–१८ शोषणाविरूध्दचा अधिकार कलम २३ मार्गदर्शक तत्वातील शैक्षणिक व अर्थिक विकासाची तरतुद कलम ४६ कलम ३३० व ३३२ नुसार संसद विधीमंडळे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्वाचा अधिकार दिला. सार्वजनिक नोकरीतील प्रतिनिधीत्वाचा दावा कलम ३३५ राष्ट्रीय आयोग कलम ३३८ अ अशा तरतुदी आहेत. संविधानात केलेल्या व्यापक व भरीव तरतुदींचा लाभ आदिवासी समाजाला मिळावा म्हणून केंद्र व राज्य सरकारानी राज्यनितीच्या मार्गदर्शक तत्वाच्या अमलबजावणी करत आदिवासी विकासात्मक कायदे केले. दोन्ही सरकारांनी घटनात्मक तरतुदींना अनुसरुन वेठबिगारी निर्मुलन, अत्याचार प्रतिबंधक जमीन संदर्भातील हक्क, जंगल हक्क, कुळ वहिवाट इत्यादी संदर्भातील केलेले कायदे आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी निश्चितच उपयुक्त ठरले आहेत. महाराष्ट्र जनजाती सुधारणा कायद्यामुळे पिढयानपिढया आदिवासींचे होणारे शोषण व आर्थिक पिळवणूक थांबण्यास काही प्रमाणात मदत झालेली आहे, असे दिसून येते.


समारोप सत्रामध्ये डॉ.व्ही.डी.कापडी, डॉ.श्रीमती के.एम.अहिरे, प्रा.प्रदिप देशपांडे, प्रा.ज्ञानोबा ढगे, प्रा.थोरात यांनी चर्चासत्राच्या यशस्वीविषयी व्यासपीठावर प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या चर्चासत्रात ५६ प्राध्यापक आणि ७२ विद्यार्थ्यांनी अशा एकुण १२८ प्रतिनिधींनी सहभाग घेतला. समारोप सत्राचे आभार प्रा.ए.ए.पोटे तर सुत्रसंचलन प्रा.आर.डी.आंगवाने यांनी केले. या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रा.एम.जी.ठाकरे, प्रा.श्रीमती एस.आर.शिंदे, प्रा.श्रीमती ए.आर.पगार, प्रा.एम.जी. ठाकरे, प्रा.डॉ.एस.के.दळवी, प्रा.डॉ.एस.एन.पगार, प्रा.नामदेव काकड, प्रा.डी.के.खुर्णे, प्रा.पी.के.शिंदे, प्रा.के.एस.गोपाळे, प्रा.एस.एम.गाडे, प्रा.मनोहर जोपाळे, प्रा.यु.ए.पठाडे, प्रा.डॉ.डी.एल.फलके, प्रा.अशोक भवर,, प्रा.वाय.एल.भारस्कर, श्री.डी.बी.कानडे., श्री.एस.बी.तांबे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.


प्रा.ए.ए.पोटे
HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

डॉ.श्रीमती जे.डी.सोनखासकर
प्राचार्य
जी. एस. डी. आर्ट्स बी. डब्ल्यु. कॉमर्स
अँण्ड सायन्स कॉलेज, सिन्नर, जि. नासिक.








MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
M.D. ARTS, B.W. COMMERCE
SCIENCE COLLEGE SINNAR
आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र
राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र आणि आय.क्यु.ए.सी. विभाग
"महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी"


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR


INNAR


MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR
आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र
" महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी "


PRASARAK SAMAJ NASHIK
G.M.D. ARTS, B.W. COMMERCE
& SCIENCE COLLEGE SINNAR
आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र
" महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी "

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

## गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर

ता. सिन्नर, जि. नाशिक – ४२२ १०३

फोन : (०२५५१) २२००९९ फॅक्स – २२०११४

Email - sinnarcollege001@yahoo.com

सा.फु. पुणे विद्यापीठ मान्यता प्राप्त – नॅक पुर्नमुल्यांकन श्रेणी 'अ' (सी.जी.पी.ए. ३.०४)

**ग्रामीण विभागातील सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार**



सा.फु. पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत

# आंतरविद्याशाखीय राज्यस्तरीय चर्चासत्र

## विषय – महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी

शनिवार, दि. २४ फेब्रुवारी २०१८

**✻ आयोजक ✻**

राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र आणि आय.क्यु.ए.सी. विभाग

**✻ आपले स्नेहांकित ✻**

**डॉ. श्रीमती जे. डी. सोनखासकर** (प्राचार्या)

**प्रा.ए.ए.पोटे** (समन्वयक) — **डॉ. ए.एच. काटेगांवकर** (आय.क्यु.ए.सी. समन्वयक)

| | | | |
|---|---|---|---|
| डॉ.एस.एन.पगार<br>संयोजक<br>अर्थशास्त्र विभागप्रमुख | प्रा.आर.व्ही.पवार<br>संयोजक<br>संरक्षणशास्त्र विभागप्रमुख | प्रा.एस.के.आवारे<br>संयोजक<br>इतिहास विभागप्रमुख | प्रा.आर.डी.आगवणे<br>संयोजक<br>राज्यशास्त्र विभाग |

# सस्नेह निमंत्रण

बुक-पोस्ट

प्रति,

________________

________________

________________

**-: निमंत्रक :-**

**डॉ. श्रीमती जे. डी. सोनखासकर**

प्राचार्या

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर

ता. सिन्नर, जि. नाशिक – ४२२ १०३

फोन : (०२५५१) २२००९९ फॅक्स – २२०११४

Email - sinnarcollege001@yahoo.com

## ✻ आयोजन समिती ✻

| | |
|---|---|
| प्राचार्या डॉ. श्रीमती जे. डी. सोनखासकर | ९४२२२५६७५८ |
| प्रा.ए. ए. पोटे (समन्वयक) | ७५८८१७४९२४ |
| डॉ.एस.एन. पगार (संयोजक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख) | ७७५६८२१९०५ |
| प्रा.आर.व्ही. पवार (संयोजक, संरक्षणशास्त्र विभाग प्रमुख) | ९८२२९७८३२५ |
| प्रा.एस.के.आवारे (संयोजक, इतिहास विभाग प्रमुख) | ९४२२२९२८४८ |
| प्रा.आर.डी. आगवणे (संयोजक, राज्यशास्त्र विभाग) | ९७६६१०२८०० |
| डॉ.ए. एच. काटेगांवकर (समन्वयक, आय.क्यु.ए.सी.) | ९४२१०२७६६३ |

## ✻ सहसंयोजक ✻

डॉ. श्रीमती ए.डी.सोनवणे — प्रा. पी.के. शिंदे

प्रा. श्रीमती ए.आर. पगार — डॉ.एस.के. दळवी

प्रा. वाय.एल. भास्कर — प्रा. डी. के. खुर्चे

प्रा. एस.बी. गाडे

श्री.डी.बी. कानडे (प्रबंधक) — श्री. एस.बी. तांबे (लेखापाल)

## ✻ सल्लागार समिती ✻

डॉ. आर.पी.भामरे (प्राचार्य, मनमाड महाविद्यालय)
(सदस्य, इतिहास अभ्यास मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

डॉ. व्ही. डी. कापडी
(सदस्य, राज्यशास्त्र व लोकप्रशासन अभ्यास मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

डॉ. व्ही. डी. आवारी
(सदस्य, राज्यशास्त्र व लोकप्रशासन अभ्यास मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

डॉ. डी. सी. वाबळे
(सदस्य, राज्यशास्त्र व लोकप्रशासन अभ्यास मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

डॉ. श्रीमती के. एम. आहिरे
(सदस्य, सिनेट सा.फु. पुणे विद्यापीठ)

डॉ. श्रीमती ए.डी. सोनवणे
(सदस्य, व्यावसायिक अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

डॉ. पी. ए. घोष
(सदस्य, संरक्षणशास्त्र अभ्यास मंडळ, सा.फु. पुणे विद्यापीठ)

Scanned by CamScanner

## संस्थेविषयी :-

मराठा विद्या प्रसारक समाज ही महाराष्ट्रातील अग्रगण्य शिक्षण संस्था आहे 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या ध्येयाने प्रेरित असलेल्या संस्थेची स्थापना सन १९१४ साली करण्यात आली. शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविण्याच्या कार्यात कर्मवीर रावसाहेब थोरात, कर्मवीर गणपत दादा मोरे, कर्मवीर डी.आर. भोसले, कर्मवीर आण्णासाहेब मुरकुटे, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कर्मवीर काकासाहेब वाघ, कर्मवीर किर्तीवान निंबाळकर यांचा सिंहाचा वाटा आहे. मराठा बोर्डींग या माध्यमातुन संस्थेची वाटचाल सुरु झाली. आता या संस्थेच्या ४५१ विविध शैक्षणिक शाखांमधून २ लाखाच्या वर विद्यार्थी शिक्षण घेत आहे. कर्मवीर ॲड. बाबुरावजी ठाकरे, कर्मवीर ॲड. विठ्ठलरावजी हांडे, कर्मवीर डॉ. वसंतरावजी पवार यांच्या मार्गदर्शनाने संस्थेचा विकास झाला. औपचारिक शिक्षणाबरोबर विधी व्यावसायिक अभियांत्रिकी, वैद्यकिय, औषधनिर्माण, कृषी आदि शिक्षण देण्याचे कार्य चालु आहे.

## आमचे महाविद्यालय :-

सन १९६९ साली स्थापन झालेल्या आमच्या महाविद्यालयाचे चालु वर्षी ४९ व्या वर्षात पदार्पण केले आहे. गुरुवर्य मामासाहेब दांडेकर यांच्या समृध्द कर्तृत्वाचा वारसा लाभलेल्या सिन्नर महाविद्यालयाने नेहमीच विविध क्षेत्रात प्रगती केलेली आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर हा एक दुष्काळी तालुका असून येथील विडी व्यवसायाबरोबर १९८० नंतर एक औद्योगिक नगरी म्हणून प्रसिध्द आहे. सन १९६९ पासून पदवी स्तरावर व १९८७ पासून पदव्युत्तर स्तरावर विविध विषय विशेष स्तरावर शिकविले जातात. नुकतेच नॅक पुनर्मुल्यांकन 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे. महाविद्यालयाची प्रशस्त इमारत, भव्य क्रीडांगण, समृध्द ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, विद्यार्थीनी वसतिगृह सुखसोयीयुक्त आणि प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद महाविद्यालयाच्या उत्कर्षात योगदान करीत आहेत.

## चर्चासत्राविषयी :-

शै. वर्ष २०१७-१८ मध्ये विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत महाविद्यालयास सामाजिक शास्त्र विषयांतर्गत 'महाराष्ट्रातील आदिवासी चळवळी' हे एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र आयोजित करण्यास मान्यता मिळाली आहे. या चर्चासत्राचा उद्देश आदिवासींचा राजकिय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळींचा अभ्यास तसेच महिलांच्या राजकिय सहभागाबरोबरच त्यांची सुरक्षितता व उपाययोजना, त्यांचे कायदे, मानवी हक्क विकास योजना आणि विस्थापन व पुनर्वसनाच्या समस्यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. विविध स्वयंसेवी संस्था, प्रसार माध्यमे व शासनाची भुमिका यांचे मुल्यमापन अभ्यासणे या उद्देशाने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले आहे.

## चर्चासत्राचे विषय :-

- आदिवासी समुहाचे राजकीय जीवन
- आदिवासी महिलांचा राजकीय सहभाग
- आदिवासांच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक चळवळी
- आदिवासींची ऐतिहासिक पार्श्वभूमी व जीवन
- आदिवासींची सुरक्षितता, समस्या व उपाययोजना
- आदिवासींची सांस्कृतिक व शैक्षणिक चळवळ
- आदिवासी जमातीचे नेतृत्व व भुमिका
- आदिवासींचे कायदेशीर, मानवी हक्क व वस्तुस्थिती
- आदिवासांची विस्थापन व पुनर्वसन समस्या
- आदिवासींच्या विकासात एन.जी.ओ. ची भुमिका
- आदिवासी आणि नक्षलवाद सद्य:स्थिती
- मुख्य विषयाच्या अनुषंगाने येणारे सर्व विषय

## * विषय तज्ञ *

डॉ. पी. डी. देवरे

(अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद, राजकिय विश्लेषक)

डॉ. वासंती रासम

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

डॉ. प्रशांत अमृतकर

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

डॉ. श्री. मुकुंद दिक्षीत

(सचिव, लोक आधार सामाजिक संस्था, नाशिक)

श्रीमती प्रतिभा शिंदे

(जनरल सेक्रेटरी, लोकसंघर्ष मोर्चा, नंदुरबार)

डॉ. शुभांगी राठी

(कोटेच्या महिला महाविद्यालय, भुसावळ)

- निवड झालेले शोधनिबंध युजीसी मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय नियत कालिकामध्ये प्रकाशित करण्यात येतील.
- इंग्रजी शोधनिबंधासाठी M.S. Word, New Times Roman-12 आणि मराठी शोधनिबंधासाठी Kruti Dev - 50 साईज १४ या फॉरमॅटमध्ये असावेत. (शब्दमर्यादा २५००)
- शोधनिबंध पाठविण्याची अंतिम तारीख २२/२/२०१८
- शोधनिबंधासाठी इमेल - rajendraagwane@gmail.com किंवा potearun@gmail.com
- शोधनिबंधासाठी नोंदणी शुल्क -
  प्राध्यापक प्रतिनिधी रु. ३००/-
  शोधनिबंध प्रकाशन शुल्क रु. ६००/-
  विद्यार्थी प्रतिनिधी रु. २००/-

टिप - चर्चासत्रास सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्राध्यापकांनी येतांना महाविद्यालयाच्या ओळखपत्राची एक छायांकित प्रत सोबत आणावी.

## प्रमुख मान्यवरांच्या सदिच्छा भेटी :-

मा. डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे

(अध्यक्ष, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक)

मा. श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते

(सभापती, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक)

मा. श्री. राघो काशिराम आहिरे

(उपसभापती, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक)

मा. श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार

(सरचिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक)

## * कार्यक्रमाचे अध्यक्ष *

मा. श्री. हेमंत (नाना) विठ्ठलराव वाजे

(संचालक, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक)

## * कार्यक्रमाचे उद्घाटक *

मा. डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले

(चिटणीस, मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक)

## * प्रमुख अतिथी *

मा. नयनाताई गावित

(उपाध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक)

## * प्रमुख बीजभाषक *

मा. डॉ. विनायक तुमराम

(जेष्ठ अभ्यासक, आदिवासी साहित्यिक, नागपूर)

स्थळ

**सेमिनार हॉल,**

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर

ता. सिन्नर, जि. नाशिक - ४२२ १०३

Scanned by CamScanner